रासनिप्रा

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे

**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे — ४११००१**

**फोन नं. - (०२०) २६०५०६४१ ई मेल आयडी - sceapune@gmail.com**


**निवडणूक महत्वाचे** जा. क्र. रासनिप्रा/कक्ष-११/को.जि.स.दूध उ.संघ/नि.कार्य.मंजूरी/ ३४२५/२०२६

दिनांक :- ०८/०९/२०२६

**वाचावे:-**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४
३. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब अधिसुचना दिनांक ०६.०८.२०१८ रोजी प्रसिध्द झालेले महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम २०१७
४. कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक सनित-१६२५/प्र.क्र.९०/१३ स, दिनांक ०५.१२.२०२५
५. प्राधिकरणाकडील जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-११/निवडणूक स्थ./शासन आदेश/५२२६/२०२५ दि.५.१२.२०२५
६. कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक सनित-१६२५/प्र.क्र.२०१/१३ स, दिनांक २३.०२.२०२६
७. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/निवडणूका सुरु करणे/आदेश/७२५/२०२६ दिनांक २४.०२.२०२६
८. मा. सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली येथे दाखल M.A. Diary No.४५६४८/२०२६ in SLP No.१६३३२/२०२६ मध्ये दिनांक १०.०८.२०२६ रोजी पारीत केलेले आदेश.
९. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/को.जि.स.दूधउ.संघ/निनिअ आदेश/३४०५/२०२६ दिनांक ०७.०९.२०२६
१०. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध) पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.प्रादुविअ/क-१/को.जि.दू.संघ/निवडणूक/१७४०/२०२६ दि.०८.०९.२०२६

**प्रस्तावना:-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे ७३ कब मधील तरतुदीस अनुसरुन दिनांक ३०/०३/२०१३ रोजी अधिसूचनेद्वारे राज्य सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, निर्देशन, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी प्राधिकरणावर आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ नियम ३ (v) नुसार राज्यातील संचालक मंडळाची मुदत संपलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणेचे घोषणा /आदेश जिल्हा/ तालुका / वार्ड सहकारी निवडणूक अधिकारी यांना उपरोक्त वाचावे क्रमांक २ व ३ मधील तरतूदीनुसार दिलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, शासनाकडील वाचावे क्र. ४ च्या आदेशानुसार, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३कक मधील तरतुदीनुसार राज्यात सध्या सुरू असलेल्या नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुका तसेच येऊ घातलेल्या इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभुमीवर, ज्या प्रकरणी सहकारी संस्थेची निवडणूक घेण्याबाबत मा.उच्च न्यायालय/मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेशीत केले आहे अशा सहकारी संस्था वगळून राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका (सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) शासन आदेशाच्या दिनांकापासून सध्या ज्या टप्प्यावर आहेत त्या टप्प्यावर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका पूर्ण होईपर्यंत पुढे ढकललेल्या आहेत. तसेच शासनाने मुद्दा क्र. ५ अन्वये मतदार यादी प्रसिध्दीचा टप्पा सुरु असलेल्या संस्था (अशा संस्थांची अंतिम मतदार यादी प्रसिध्द होईपर्यंत कार्यवाही चालु ठेवता येईल) अशी सुट दिलेली आहे. सदर बाब प्राधिकरणाने वाचावे क्र. ५ अन्वये सर्व जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना अवगत केलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, शासनाकडील वाचावे क्र. ६ चे पत्रान्वये राज्य निवडणूक आयोगाद्वारे राज्यातील १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका जाहीर करण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने दिनांक १०.०२.२०२६ पर्यंत राज्यातील १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका पार पडल्या आहेत. सद्यस्थितीत राज्यात उर्वरित स्थानिक

स्वराज्य संस्थांचा निवडणूक कार्यक्रम अद्याप जाहीर झाला नसल्याने राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका तात्काळ सुरू करणेबाबत प्राधिकरणास विनंती केलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्र.७ चे आदेशान्वये शासनाने पुढे ढकललेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणे, टप्पा क्र. १ ते ई-१ सन २०२५ मधील प्रलंबित सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरू करणे, प्रलंबित सहकारी संस्थांच्या निवडणूकांकरीता अर्हता दिनांक निश्चित करणे, तसेच ई-१ सन २०२६ मध्ये निवडणूकीस पात्र होणाऱ्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरू केलेल्या आहेत. आणि,

ज्या अर्थी, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर (गोकुळ) या संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे SLP No.१६३३२/२०२६ दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेत Miscellaneous Application No.४५६४८/२०२६ करण्यात आलेले आहे, त्यावर मा. सर्वोच्च न्यायालयाने वाचावे क्र. ८ चे आदेशानुसार सदर संस्थेची निवडणूक प्रक्रिया आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसाचे आत पूर्ण करण्याचे निर्देश दिलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध) पुणे विभाग पुणे यांनी **कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर (गोकुळ)** या संस्थेची **प्रारूप मतदार यादी दिनांक १२.०८.२०२६** रोजी व **अंतिम मतदार यादी दिनांक ०४.०९.२०२६** रोजी प्रसिध्द प्रसिध्द केलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्र. ९ चे आदेशान्वये उक्त संस्थेच्या निवडणूकीकरीता श्रीमती मोसमी चौगुले, उपविभागीय अधिकारी, उपविभाग करवीर जि. कोल्हापूर यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध) पुणे विभाग पुणे यांनी वाचावे क्र. १० चे पत्रान्वये उक्त संस्थेचा निवडणूक कार्यक्रम प्राधिकरणाच्या मान्यतेस्तव सादर केलेला आहे. आणि,

ज्या अर्थी, निवडणूक नियम १८ नुसार निवडणूक कार्यक्रमास प्राधिकरणाने मान्यता देणेची तरतुद आहे. आणि,

त्या अर्थी, प्राधिकरण उक्त निवडणूक कार्यक्रमाबाबत पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## -: आदेश:-

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चा नियम १८ नुसार प्राधिकरणास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर (गोकुळ)** या संस्थेचा सोबत जोडलेल्या "परिशिष्ट- अ" प्रमाणे निवडणूक कार्यक्रम मंजूर करीत आहे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे-१ सत्यमेव जयते

**(अशोक गाडे)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति :-**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध) पुणे विभाग पुणे.
२. श्रीमती मोसमी चौगुले, निवडणूक निर्णय अधिकारी, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर (गोकुळ) तथा उपविभागीय अधिकारी, उपविभाग करवीर जि. कोल्हापूर

२/- यांनी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार, अधिनियम, नियम व संस्थेचे मंजुर उपविधीनुसार निवडणूक प्रक्रिया पार पाडून तसा अहवाल जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचेमार्फत सादर करावा.

**प्रत माहितीस्तव :-**

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर (गोकुळ)

परिशिष्ट- अ

नमुना ई-४ ( महाराष्ट्र सहकारी संस्था ( समिती निवडणूक ) नियम २०१४ चे नियम १९ पहा)

## कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि.कोल्हापूर (गोकुळ) जि.कोल्हापूर.

**महाराष्ट्र सहकारी संस्था ( समिती निवडणूक ) नियम २०१४ चे नियम १९ अन्वये निवडणूक कार्यक्रमातील विविध टप्पे**

**निवडणूक वर्ष सन २०२६ ते २०३१**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम १८ व १९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या निवडणुकीकरिता मी मोसमी चौगुले, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, करवीर 'कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि. कोल्हापूर (गोकुळ) जि. कोल्हापूर या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक सन २०२६ ते २०३१ च्या निवडणुकीतील कार्यक्रमाचे विविध टप्पे खालील प्रमाणे जाहीर करीत असून त्यामधील अनुसूचीच्या स्तंभ दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या पूर्व मान्यतेनुसार नियत करीत आहे.

अंतिम मतदार यादी प्रसिद्ध दिनांक - ०४.०९.२०२६

| अ.क्र | मतदार संघाचे नाव व निवडून द्यावयाची सदस्य संख्या | | निवडणूक कार्यक्रम प्रसिद्धी दिनांक | नामनिर्देशन करण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण | मिळालेली नामनिर्देशन पत्रे प्रसिध्दीचा दिनांक, वेळ व ठिकाण | नामनिर्देशन पत्र छाननीचा दिनांक, वेळ व ठिकाण | छाननीनंतर वैध नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्दीचा दिनांक, वेळ व ठिकाण | ज्या दिनांकास उमेदवारी अर्ज मागे घेता येईल तो दिनांक, वेळ व ठिकाण | निवडणूक लढविणा-या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्दीचा व चिन्हांचे वाटप करण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व ठिकाण | मतमोजणी दिनांक, वेळ व ठिकाण | मतदानाचा निर्णय घेषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | सर्वसाधारण | २० | दिनांक १५.०९.२०२६ | दि.१५.०९.२०२६ ते २२.०९.२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात | दि.१५.०९.२०२६ ते २२.०९.२०२६ रोज जसजशी प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज संध्याकाळी ४.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.२३.०९.२०२६ सकाळी ११.०० ते छाननी संपेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय | दि.२४.०९.२०२६ सकाळी ११.०० वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व संस्था कार्यालय नोटीस बोर्ड | दि.२४.०९.२०२६ ते ०८.१०.२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय | दि.०९.१०.२०२६ सकाळी ११.०० वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व संस्था कार्यालय नोटीस बोर्ड | दि.१८.१०.२०२६ सकाळी ८.०० वा. ते संध्या. ५.०० पर्यंत ठिकाण नंतर जाहीर करणेत येईल | दि.१९.१०.२०२६ सकाळी ८.०० वाजता ठिकाण नंतर जाहीर करणेत येईल. | मतमोजणी संपलेनंतर लगेच |
| २ | अनुसुचित | १ | | | | | | | | | | |
| ३ | विमुक्त जाती/भटक्या जमाती/ वि.मा.प्रवर्ग | १ | | | | | | | | | | |
| ४ | इतर मागासवर्गीय | १ | | | | | | | | | | |
| ५ | महीला राखीव | २ | | | | | | | | | | |
| | एकूण | २५ | | | | | | | | | | |

जा.क्र.रासनिआ/कक्ष-अ-वर्ग/नि.का.मंजुरी ३८२५/सन २०२६,दि.०५/०९/२०२६

१. सदर निवडणूक ही महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या समितीची निवडणूक नियम २०१४ व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने निवडणुकी संदर्भात नामनिर्देशन, चिन्ह वाटप, आचार संहिता, खर्चाची कमाल मर्यादा, मतपेटी व इतर निवडणूक संबंधीचे वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेश अधिसूचना व परिपत्रकीय सूचनेनुसार निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाईल.

२. महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या समितीची निवडणूक नियम २०१४ मधील नियम २३ मधील तरतुदीप्रमाणे नामनिर्देशन अर्जाचे शुल्क रु. १००/- इतके राहील.
उमेदवारी अर्ज भरताना निवडणूक अनामत ठेव अनुसुचित जाती / जमाती उमेदवारा व्यतिरिक्त इतर उमेदवारांसाठी रू. २०००/- व अनुसूचित जाती / जमातीच्या उमेदवारांसाठी रू. ५००/- इतकी जमा करणे बंधनकारक राहील.

३. अंतिम मतदार यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात विहीत शुल्क अदा केल्यानंतर मिळेल.

४. निवडणूक निशाणी / चिन्हे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात दर्शनी फलकावर प्रसिद्ध करण्यात येतील.

५. राखीव मतदार संघातील उमेदवाराने नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम अधिकाऱ्यांचा जातीचा दाखला जोडणे बंधनकारक आहे.

६. स्तंभ क्रमांक १० मधील कामकाज वगळून निवडणूक कामकाज सार्वजनिक सुट्यांच्या दिवशी बंद राहील.

७. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय-बहुउद्देशीय हॉल, रमण मळा, कोल्हापूर

संपर्क क्रमांक Email-

दिनांक:

( मोसमी चौगुले )
निवडणूक निर्णय अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी करवीर

( देविदास मिसाळ )
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा उपविभागीय उपनिबंधक (दुग्ध) पुणे विभाग, पुणे.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
सत्यमेव जयते

( अशोक गाडे )
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा.पुणे